# प्रवेश- २०२०

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥



**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग**

**Department of External Education and Learning (DEEL)**

‘A’ Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## शुभेच्छा संदेश

शिक्षणाच्या संधी सर्वांना उपलब्ध व्हाव्यात, किंबहुना त्या सर्वांपर्यंत पोहोचाव्यात हयासाठी केवळ पारंपरिक पद्धतीच्या शाळा, महाविद्यालये आता पुरेसे राहिलेले नाहीत. वाढत्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या विस्ताराचा विचार करता पर्यायी शिक्षण प्रणालींचा वापर करणे क्रमप्राप्त झाले असून अशा पर्यायी शिक्षण प्रणालींचा विकास झपाटयाने होत आहे. पत्राद्वारे शिक्षण या पध्दतीपासून पुढे दूर शिक्षण, मुक्त शिक्षण व इलेट्रॉनिक माध्यमांतून साक्षात शिक्षण **(Virtual Learning)** अशा विविधांगांनी शिक्षण प्रणाली विकसित होत आहेत. म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग **Department of External Education and Learning (DEEL)** सुरु केलेला आहे. हा विभाग पारंपरिक विद्यापीठातील इतर विभागांपेक्षा वेगळेपण जोपासणारा विभाग आहे. या विभागाद्वारे विविध विद्याशाखांतर्गत शिक्षणक्रमांना प्रवेश दिला जात आहे. हया विभागाचा फायदा हा नोकरी मिळवण्यासाठी, नोकरीत बढती, विविध स्पर्धा परीक्षा देणाऱ्यांसाठी, व्यावसायिक, घरगुती जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या गृहिणी व अनेक कारणांमुळे पदवी, पदव्युत्तर पदवी पर्यंतच्या शिक्षणापासून वंचित राहिलेले नागरिक, इत्यादींना काम करता करता शिक्षण घेण्याची आपल्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी होईल.

बहि:स्थ शिक्षण प्रणालीद्वारे केवळ ठराविक अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर देण्यात येत नाही, तर अभ्यासक्रमासोबत विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये, दृष्टिकोन व चिकित्सक अध्ययन वृत्ती निर्माण व्हावी, हयावरही भर देण्यात येतो. शिक्षणाची प्रकिया शिक्षकाच्या अनुपस्थितीत करता येऊ शकते, हया सिध्दांतावर ही शिक्षण पद्धती भर देते. स्वयंशिक्षण व दृकश्राव्य माध्यमांचा शिक्षणात उपयोग करुन आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षण देण्यात येते. या प्रणालीद्वारे विविध अभ्यासकेंद्रांवर संपर्क सत्रांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना पुरेसे मार्गदर्शन प्राप्त करुन देऊन यशस्वीरित्या शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या अशा **'अ'** श्रेणी दर्जा असलेल्या विद्यापीठात आपण प्रवेशित होवून राष्ट्रबांधणीसाठी हातभार लावाल, यास्तव मी आपले हार्दिक स्वागत करतो. या विभागातील शिक्षणक्रमांची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत आपण पोहोचवावी. आपल्यासारखे विद्यार्थी हे निश्चितच प्रेरणादायी ठरतील अशी मला खात्री आहे.

आपला सर्वांना शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी सदिच्छा व आपले भावी आयुष्य उज्ज्वल होण्यासाठी माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा.

**प्रा. पी. पी. पाटील**
**मा. कुलगुरू**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**

## ❖ प्रस्तावना:

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र १९८९ च्या विद्यापीठ कायदा क्र. २९ (**University Act No.** २९) अंतर्गत १५ ऑगस्ट, १९९० रोजी जळगाव येथे झाली. उत्तर महाराष्ट्र विभागात उच्च शिक्षणासाठी सुवर्णसंधी उपलब्ध करुन देणे, हे विद्यापीठाचे ध्येय आहे. अतिशय अल्प कालावधीत विद्यापीठाने शिक्षण क्षेत्रात वेगळे व उच्च स्थान मिळविले आहे. एकशे नव्वदहून अधिक महाविद्यालये व पस्तीसपेक्षा जास्त मान्यताप्राप्त परिसंस्था विद्यापीठाशी संलग्नित आहेत. नॅकच्या पुनर्मूल्यांकनाद्वारे **'अ' श्रेणी** (**'A' Grade**) विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. विद्यापीठात अनेक उपक्रम राबविले जातात. विद्यापीठास आजपर्यंत अनेक बक्षिसे व मानांकने (**Awards**) प्राप्त झालेली आहेत. 'अंतरी पेटवू ज्ञानज्योत' ह्या समर्पक ब्रीदवाक्यासोबत उच्च शिक्षण व संशोधनाच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना मिळवून देण्यात विद्यापीठ नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे.

## ❖ डिल विभाग परिचय:

बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग **Department of External Education And Learning (DEEL)** हा पारंपरिक विद्यापीठातील विभागांपेक्षा वेगळेपण जोपासणारा विभाग असून विभागाद्वारे विविध विद्याशाखांतर्गत शिक्षणक्रमांची प्रवेश प्रक्रिया ते अंतिम निकालापर्यंत अंमलबजावणीची कार्ये पार पाडली जातात. तळागाळातील व्यक्ती शिक्षणापासून वंचित तसेच काही कारणास्तव शिक्षण अपूर्ण राहिले असेल अशा सर्वांसाठी बहिस्थ पद्धतीने प्रवेश सुरु करुन शिक्षणप्रवाहात ग्रामीण जनतेला प्राधान्याने उच्च शिक्षणापर्यंत जाण्याची उत्तम संधी विद्यापीठाने उपलब्ध करुन दिली आहे.

## ❖ डिल विभागाची उद्दिष्टे :

१. समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत, शहरी, ग्रामीण व आदिवासी, तसेच मागास भागातील अध्ययनार्थींच्या, शेतकरी व स्त्रियांच्या गरजा लक्षात घेऊन उच्च, व्यावसायिक, तांत्रिक, शिक्षण देण्याचे कार्य करणे.

२. शिकण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना सहजपणे शिक्षण घेता येईल, अशी लवचिक व उपक्रमशील मुक्त शिक्षण प्रणाली विकसित करणे.

३. अनौपचारिक, तसेच शैक्षणिक विस्तार सेवांच्या उपक्रमातून विविध कला कौशल्यांचा विकास करण्यासाठी गुणात्मक शिक्षण उपलब्ध करुन देणे.

४. बदलत्या तंत्रज्ञानाशी समायोजन साधण्यासाठी प्रशिक्षण देणे व व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे.

५. शैक्षणिक संधीपासून वंचित असलेल्या सर्व दुर्लक्षित समाज घटकांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देणे.

❖ **प्रवेशास पात्रगट :** विद्यार्थी,गृहिणी,नोकरी व व्यवसाय करणाऱ्या महिला,विविध क्षेत्रातील कर्मचारी (शासकीय/निमशासकीय),व्यावसायिक,सामाजिक क्षेत्रात काम करणा-या व्यक्ती,सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचारी इ.

❖ **डिल विभागाद्वारे अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांची वैशिष्ट्ये व अध्ययनार्थी (विद्यार्थी सेवासुविधा):**

१. बहि:स्थ शिक्षण प्रणालीद्वारे विद्यापीठात स्वतंत्र विभाग प्रस्थापित करण्यात आला आहे.

२. प्रत्येक पदवी व पदव्युत्तर पदवीचा पाठयक्रम (**Syllabus**) प्रस्तूत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचाच आहे.

३. शिक्षणक्रमातील परीक्षेचा साचा वार्षिक (**Annual Pattern**) आहे.

४. जळगाव, धुळे, नंदूरबार या तिन्ही जिल्ह्यांमध्ये अभ्यास केंद्रांची व परीक्षा केद्रांची सुविधा आहे.

५. ऑनलाईन प्रवेश ते गुणपत्रक मिळण्याची सुविधा आहे.

६. विषयानुसार स्वयंअध्ययन साहित्य (**Self Learning Material**) हे छापिल पुस्तके, मुद्रिते, टंकलिखिते वा अनुषंगिक तत्सम साहित्य /Soft Copy) स्वरुपात उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

**(टीप:- बहुतांश साहित्य हे मराठी माध्यमातून व अपवादात्मक विषयाचे इंग्रजी माध्यमातून उपलब्ध आहे/राहिल.)**

७. तिन्ही जिल्ह्यांमधील अभ्यास केंद्रांवर ठराविक रविवारी/ सुट्टीच्या दिवशी वेळापत्रकानूसार संमंत्रण सत्रांचे (**Counselling Sessions**) आयोजन केले जाते .

**(महत्वाचे :- ज्या शिक्षणक्रमास १० पेक्षा कमी प्रवेश असतील त्या शिक्षणक्रमांचे तसेच एम.ए. इंग्रजी, एम.ए. संरक्षण व सामरिकशास्त्र, एम. कॉम. एकूण पाच (०५) दिवसांचे तर, एम.ए.- शिक्षणशास्त्र व एल.एल.एम.शिक्षणक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे एकूण दहा (१०) दिवसांचे संमंत्रण सत्रांचे (Counseling Sessions) आयोजन ठराविक रविवारी / सुट्टीच्या दिवशी विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग (डिल), येथेच होतील याची विद्यार्थ्यांनी कृपया नोंद घ्यावी.)**

८. विद्यापीठ परिक्षांचे निकाल ३०-४५ दिवसांच्या आत विद्यापीठाच्या अधिकृत संकेस्थळावर जाहीर करण्यात येईल.

९. प्रवेश विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार व एकावेळेस एकाच शिक्षणक्रमास प्रवेश देण्यात येईल.

१०. पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रम हे नोकरी, विविध स्पर्धा परीक्षा देण्यास पात्र आहे.

११. महाविद्यालयांमध्ये नियमित प्रवेशापासून वंचित विद्यार्थी, गृहिणी, नोकरी व व्यवसाय करणाऱ्या महिला, विविध क्षेत्रातील कर्मचारी (शासकीय/निमशासकीय), व्यावसायिक, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचारी हयांच्यासाठी प्रवेशाची संधी आहे.

## प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सूचना - २०२०

**मा. विद्या परिषद ठराव क्र. वि.प. ए-५८/२०१४, दि. ०९/०४/२०१४, रोजीच्या तसेच वि.प. ए-३२/२०१८, दि. २९/०५/२०१८ रोजी झालेल्या निर्णयानुसार विभागप्रवेश ते पदवी प्रदान पर्यंतची नियमावली**

**प्रवेश सुरुवात-०१/०८/२०२०**

### १. प्रवेश पात्रता व शिक्षणक्रम प्रक्रियांबाबत नियमावली:-

१ राष्ट्रीय व राज्यस्तरावरील मुक्त विद्यापीठांच्या अध्ययनार्थीना (विद्यार्थी) स्थानांतरण प्रमाणपत्र (टी. सी.) विद्यापीठाकडून दिला जात नाही. म्हणून डील अंतर्गत प्रवेशसाठी इच्छूक अध्ययनार्थ्यांकडे त्या पूर्वी जी पदवी प्राप्त केली असेल, त्या पदवीच्या संदर्भात मूळ स्थानांतरण प्रमाणपत्र (ओरीजनल टी.सी. / एल.सी.) तसेच विद्यापीठाचे मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (ओरीजनल मायग्रेशन सर्टिफिकेट) अध्ययनार्थ्यांने प्रवेश घेतेवेळी जमा करणे अनिवार्य आहे.

२ एका विषयात पदवी पूर्ण केली आहे व दुसऱ्या विषयामध्ये पदवी करायची असेल तर सरळ द्वितीय वर्षाला प्रवेश दिला जाणार नाही.

३ इतर कोणत्याही नियमित विद्यापीठातून नियमित प्रवेशाद्वारे प्रथम वर्ष कला (एफ.वाय.बी.ए.) / एम.ए. प्रथम वर्ष पूर्ण केले असेल, तर डिल विभागा अंतर्गत बी.ए. / एम.ए. च्या शिक्षणक्रमांच्या द्वितीय वर्षाला प्रवेश दिला जाणार नाही.

४ ज्या अध्यनार्थीचे (विद्यार्थी) कागदपत्रे अपूर्ण असतील, त्या अध्यनार्थ्यांकडून किमान एक महिन्याच्या आत कागदपत्रे जमा करण्याच्या अटीवर प्रवेश अर्ज स्विकारण्यात येईल. त्या संदर्भातील अर्ज विद्यार्थ्याने डील विभागाकडे देणे अनिवार्य राहील.

५ अध्ययनार्थ्याकडे (विद्यार्थी) मूळ स्थानांतरण प्रमाणपत्र (टी.सी.) नसेल किंवा हरवले असेल, अशा काही अपवादात्मक वेळी दुय्यम स्थानांतरण प्रमाणपत्र (डुप्लीकेट टी.सी.) सादर करता येईल. मात्र त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने सादर करता येईल. याबाबतची खोटी माहिती आढळल्यास अध्ययनार्थीच(विद्यार्थी) त्यास जबाबदार राहील.

६ एकदा प्रवेश घेतला तर, कोणत्याही सबबीवर प्रवेश रद्द केला जाणार नाही व अध्ययनार्थीस (विद्यार्थी)शुल्कही परत केले जाणार नाही.

७ विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेश कालावधीत जे शुल्क निर्धारित केलेले असेल, ते भरणे अनिवार्य आहे. निर्धारित मुदतीनंतर शुल्काचे चलन भरले तर कोणत्याही सबबीवर ते शुल्क परत मिळणार नाही .

८ प्रवेश शुल्क भरतांना चुकुन दुसऱ्या शिक्षणक्रमांच्या प्रवेश शुल्काचे चलन भरले तर कोणत्याही सबबीवर ते शुल्क परत मिळणार नाही व दुसऱ्या शिक्षणक्रमांसाठी जर समान शुल्क असेल तरच वर्ग केले जातील .जर दुसऱ्या शिक्षणक्रमांसाठी समान शुल्क नसेल तर कोणत्याही सबबीवर शुल्क वर्ग केले जाणार नाही. नव्याने शुल्क भरुन शिक्षणक्रमास प्रवेश घ्यावा लागेल.

९ ज्या शिक्षणक्रमांना अंतर्गत कार्यात (Internal Work) जसे स्वाध्याय (Assignments), आंतरवासिता (Internship), प्रात्यक्षिके (Practicles), क्षेत्रीय कार्य (Field Work), शोध निबंध अहवाल (Dessertation), परिसंवाद (Seminar), मौखिक परीक्षा (Viva - voce) अनुषंगिक कार्य असेल ते वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे .

१० संबंधित अभ्यास केंद्रावर शिक्षणक्रमनिहाय १० अध्ययनार्थीपेक्षा कमी अध्ययनार्थ्यांचे प्रवेश असतील तर, त्या केंद्रावरील अध्ययनार्थीचे प्रवेश डील विभागात स्थलांतरित केले जातील. त्याबाबतचा अंतिम निर्णय व अधिकार डील विभागाचा असेल.

११ कोणत्याही अध्ययनार्थ्यांस(विद्यार्थी) वैयक्तिक रित्या अध्ययन साहित्य (Study Material) पाठविले जाणार नाही.

१२ यापूर्वी डील विभागात प्रवेशित ज्या अध्ययनार्थीनी (विद्यार्थी) बी.ए./बी. कॉम प्रथम वर्षास प्रवेश घेतला आहे, मात्र परीक्षा दिली नाही किंवा काही पेपर अनुत्तीर्ण झालात, तरी बी.ए./बी.कॉम द्वितीय वर्षास प्रवेश घेता येईल. मात्र ज्या अध्ययनार्थीनी (विद्यार्थ्यांनी ) प्रथम वर्ष पास / उत्तीर्ण केले आहे त्यांनाच तृतीय वर्षास प्रवेश घेता येईल; परंतु ज्यांचे द्वितीय वर्ष जरी उत्तीर्ण (पास) असेल; परंतु प्रथम वर्ष उत्तीर्ण केले नाही, त्यांना तृतीय वर्षास प्रवेश घेता येणार नाही.

१३ पदवी शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यापासून किमान तीन (३) वर्षे व जास्तीत जास्त सहा (६) वर्षांमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच पदव्युत्तर शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यापासून किमान दोन (२) वर्षे व जास्तीत जास्त चार (४) वर्षांमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. काही कारणास्तव प्रथम वर्षाची परीक्षा देऊ शकले नाहीत, तरी द्वितीय वर्षास प्रवेश घेण्यास अध्ययनार्थी (विद्यार्थी)पात्र असेल. जर चार (४) वर्षात पदव्युत्तर शिक्षणक्रम व सहा (६) वर्षात पदवी शिक्षणक्रम पूर्ण झाला नाही तर विद्यापीठ नियमानुसार शुल्क (Fee) भरुन पुढील परीक्षेच्या संधी दिल्या जातील. मात्र परीक्षेचे शुल्क हे पूनर्परीक्षार्थी (Repeater) अध्ययनार्थ्यांना जे लागू राहील त्याप्रमाणे विद्यापीठ नियमानुसार अतिरिक्त शुल्क भरुन परीक्षा देता येईल. विद्यापीठ नियमानुसार अतिरिक्त संधीत आपण शिक्षणक्रम पूर्ण करु शकला नाही, तर नव्याने प्रथम वर्षापासून प्रवेश घ्यावा लागेल.

१४ डील विभागाच्या शिक्षणक्रम अंमलबजावणी अंतर्गत होणाऱ्या विविध प्रक्रियांबाबतचे निर्णय, वेळोवेळी होणारे बदल यांबाबतचे सर्वाधिकार डील विभागास राहातील. प्रवेश पात्रता व शिक्षणक्रम अंमलबजावणी प्रक्रियेबाबत होणारे बदल स्वीकारणे अध्ययनार्थ्यांना (विद्यार्थी) बंधनकारक राहिल.

## २. प्रवेश प्रक्रियांबाबत नियमावली :-

१. पदवी व पदव्युत्तर **शिक्षणक्रमांना** प्रवेश घेणाऱ्या अध्ययनार्थीनी (विद्यार्थ्यांनी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजूस असलेल्या Quick Link अंतर्गत DEEL (External Mode) लिंकवर जाऊन Admission २०१९-२० लिंक वर Click करावे .

२. सोबत जोडलेली माहिती काळजीपूर्वक वाचुन मगच प्रवेश ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात करावी. अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही.

३. प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या ज्या अध्ययनार्थ्यांचा (विद्यार्थ्यांचा) ऑनलाईन प्रवेश अर्जावर जर PRN असेल तर त्या विद्यार्थ्यांनी सदर PRN चा उल्लेख असलेल्या महाविद्यालयाचा ऑनलाईन टि.सी प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४. यापूर्वी डील विभागात प्रवेशित ज्या अध्ययनार्थ्यांचे (विद्यार्थ्यांचे) बी.ए./बी.कॉम.तृतीय वर्षास प्रवेश घेणे बाकी असेल त्यांना तृतीय वर्षास प्रवेश मिळेल.

५. द्वितीय/तृतीय वर्षास ONLINE प्रवेशावेळी आपला जो PRN क्रमांक यापूर्वी प्रथम वर्षास मिळाला आहे तो टाकून प्रक्रिया करावी.

६. फोटो / सही अपलोड करायची राहिली असल्यास ती प्रक्रिया पूर्ण करावी.

७. सोबत दिलेल्या चलनामध्ये हाताने माहिती भरुन All over India मधील जवळच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेत दिलेले चलन भरावे.

८. द्वितीय/तृतीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या अध्ययनार्थ्यांनी (विद्यार्थ्यांनी) प्रवेश अर्जासोबत डील विभागाद्वारे प्राप्त मुळ गुणपत्रकाची झेरॉक्स साक्षांकीत प्रत जोडावी. कृपया Online गुणपत्रिकेची झेरॉक्स जोडू नये. जर आपण गुणपत्रक घेतले नसेल तर संबंधित केंद्रावर किंवा डील विभागात **फोन नं. ०२५७-२२५७४९५/२२५८४९६** वर संपर्क साधावा.

९. द्वितीय/तृतीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या ज्या अध्ययनार्थ्यांनी (विद्यार्थ्यांनी) आजपर्यंत मुळ T.C./ MIGRATION जमा केलेले नाही त्यांनी या प्रवेशावेळी अर्जासोबत जमा करावेत. त्याशिवाय आपला अर्ज स्वीकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. अध्ययन साहित्य हे SOFT COPY तसेच Print स्वरूपात कसे उपलब्ध होणार आहे. याबाबतच्या सूचना Self Learning Material (SLM) अंतर्गत स्वंतत्रपणे देण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.

११. यापूर्वी डील(आयडीयल) विभागात प्रवेशित अध्ययनार्थ्यांना (विद्यार्थ्यांना) सूचना - आपणास यापूर्वी २०१३-२०१४ चे जे मुळ गुणपत्रक प्राप्त झाले होते ते जर बदलवून घेतले नसतील तर डील विभागात सदरचे मुळ गुणपत्रक जमा करुन सुधारीत गुणपत्रक घेवुन जावे. याबाबतची सूचना २०१४ पासुन देत आहोत व वेबसाईटवरही टाकलेली आहे.

❖ **अत्यंत महत्वाचे :-** अध्ययनार्थीने (Student) आपला ऑनलाईन प्रवेशावेळी दिलेला ईमेल व पासवर्ड, भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) निकाल हातात येईपर्यंत काळजीपूर्वक जपून ठेवणे अनिवार्य राहिल. अन्यथा डील विभागाकडून प्रवेश ते अंतिम निकालप्रक्रिये दरम्यान होणाऱ्या अंमलबजावणींची माहिती किंवा संदर्भिय बदल याबाबत वेळोवेळी पाठविले जाणारे संदेश (SMS) सुविधेचा लाभ अध्ययनार्थींना घेता येणार नाही. व काही शैक्षणिक नुकसान झाल्यास अध्ययनार्थी त्यास स्वत: जबाबदार राहील. याची नोंद घ्यावी.

**(टीप :- ईमेल व भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) हयांत बदल असल्यास त्वरीत डील विभागाशी ०२५७ - २२५७४९५/२२५८४९६ या दूरध्वनीवर किंवा प्रत्यक्ष येवून बदल करून घ्यावा.)**

## ❖ उपलब्ध शिक्षणक्रम शुल्क व स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता:-

| शिक्षणक्रम | प्रवेश पात्रता | प्रवेश फी प्रति वर्ष परीक्षा फी सह | कालावधी (वर्ष) / माध्यम | स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता |
|---|---|---|---|---|
| बी.ए. द्वितीय वर्ष | कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची (बोर्ड) बारावीची परीक्षा उत्तीर्ण **किंवा** समकक्ष असलेली परीक्षा/पदविका (एम.सी.व्ही.सी./ डी.एड/डी.टी.एड./डी. फार्मसी) उत्तीर्ण | | कालावधी - ०३-०६ वर्ष माध्यम - मराठी | मराठी,हिंदी,इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्रची छापिल पुस्तके आहेत, तर अर्थशास्त्र,Optional English ची पुस्तके उपलब्ध नाहीत. |
| | | **3500/-** | | हिंदी,इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र हे SOFT COPY माध्यमात उपलब्ध तर, मराठी, मानसशास्त्र अध्ययन साहित्य उपलब्ध नाही. |
| बी.ए. तृतीय वर्ष | | **2800/-** | | अध्ययन साहित्य उपलब्ध नाही . |
| बी.कॉम. द्वितीय वर्ष | कोणत्याही मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची (बोर्ड) बारावीची परीक्षा उत्तीर्ण **किंवा** समकक्ष असलेली परीक्षा/पदविका (एम.सी.व्ही.सी./ डी.एड/डी.टी.एड./ डी.फार्मसी) उत्तीर्ण | | कालावधी - ०३-०६ वर्ष माध्यम - मराठी | मराठी,हिंदी,इंग्रजी, ची छापिल पुस्तके आहेत, मात्र Computing Skills,Modern Office Management, Principles & Practices of Banking हे SOFT COPY माध्यमात उपलब्ध, तर Micro Economic Analysis, Financial and Cost Accounting साठी अध्ययन साहित्य उपलब्ध नाही. |
| | | **3600/-** | | MacroEconomic Analysis, Corporate Accounting & Costing साठी अध्ययन साहित्य उपलब्ध नाही. तर बाकी विषय SOFT COPY माध्यमात उपलब्ध आहेत. |
| बी.कॉम. तृतीय वर्ष | | **2850/-** | | अध्ययन साहित्य उपलब्ध नाही. |
| एम. ए. - मराठी | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची/राज्य शासनाद्वारे वा केंद्र शासनाद्वारे मान्यता प्राप्त संस्थेची पदवी परीक्षा उत्तीर्ण **किंवा** समकक्ष असलेली पदवी उत्तीर्ण | **5250/-** | कालावधी ०२-०४ वर्ष माध्यम मराठी, हिंदी, इंग्रजी | प्रथम वर्ष साठी सर्व विषयांची छापिल पुस्तके आहेत. तर, द्वितीय वर्ष साठी सर्व विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य SOFT COPY माध्यमात उपलब्ध आहेत. |
| एम. ए. - हिंदी | | | | |
| एम. ए. - इंग्रजी | | | | |
| एम. ए. - इतिहास | | **5250/-** | कालावधी ०२-०४ वर्ष माध्यम - मराठी | |
| एम. ए. - समाजशास्त्र | | **5250/-** | कालावधी ०२-०४ वर्ष माध्यम - मराठी | प्रथम वर्ष साठी Social Structure and Social Change विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य SOFT COPY माध्यमात उपलब्ध आहे तर, उर्वरित सर्व विषयांची छापिल पुस्तके आहेत. द्वितीय वर्ष साठी सर्व विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य SOFT COPY माध्यमात उपलब्ध आहेत. |

| शिक्षणक्रम | प्रवेश पात्रता | प्रवेश फी प्रति वर्ष परीक्षा फी सह | कालावधी (वर्ष) / माध्यम | स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता |
|---|---|---|---|---|
| **एम. ए.**<br>- राज्यशास्त्र | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची/राज्य शासनाद्वारे वा केंद्र शासनाद्वारे मान्यता प्राप्त संस्थेची पदवी परीक्षा उत्तीर्ण **किंवा** समकक्ष असलेली पदवी उत्तीर्ण | **5250/-** | कालावधी<br>**०२-०४ वर्ष माध्यम -** मराठी | **प्रथम वर्ष साठी** Indian Foreign Policy , Modern Political Issues & Democracy in India **विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य SOFT COPY माध्यमात उपलब्ध आहे** तर, उर्वरित विषयांचे छापिल पुस्तक आहे . तसेच **द्वितीय वर्ष साठी सर्व विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य SOFT COPY माध्यमात उपलब्ध आहेत.** |
| **एम. ए.**<br>अर्थशास्त्र | | **5250/-** | कालावधी<br>**०२-०४ वर्ष माध्यम -** मराठी | **प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष साठी SOFT COPY माध्यमात स्वयं अध्ययन साहित्य उपलब्ध आहे** |
| **एम. ए.**<br>- संरक्षण व सामरिकशास्त्र | | **4250/-** | **कालावधी - ०२-०४ वर्ष माध्यम -** मराठी | **प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष साठी स्वयं अध्ययन साहित्य उपलब्ध नाही** |
| एम.कॉम. | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची/राज्य शासनाद्वारे वा केंद्र शासनाद्वारे मान्यता प्राप्त संस्थेची वाणिज्य व व्यवस्था- -पनातील पदवी परीक्षा उत्तीर्ण **किंवा** (बी.कॉम/बी.बी.ए./ बी.एम.एस.) समकक्ष असलेली पदवी उत्तीर्ण | **5250/-** | **कालावधी - ०२-०४ वर्ष माध्यम -** मराठी /इंग्रजी | **प्रथम वर्ष साठी Economics of Industries & Environment & Accountency विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य उपलब्ध नाही ,** **तर** बाकी सर्व विषय **SOFT COPY माध्यमात** उपलब्ध आहे. तसेच **द्वितीय वर्ष साठी सर्व विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य SOFT COPY माध्यमात उपलब्ध** |
| एल.एल.एम.<br>**प्रथम वर्ष** | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्या-पीठाची/राज्य शासनाद्वारे वा केंद्र शासनाद्वारे मान्यता प्राप्त संस्थेची एल.एल.बी. पदवी उत्तीर्ण (किमान ५०% सह) | **11000/-** | **कालावधी - ०२-०४ वर्ष माध्यम -** इंग्रजी | **प्रथम वर्ष साठी सर्व विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य SOFT COPY माध्यमात उपलब्ध आहे.** |
| एल.एल.एम.<br>**द्वितीय वर्ष** | | **9000/-** | | **द्वितीय वर्ष साठी सर्व विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य उपलब्ध नाही** |

| शिक्षणक्रम | प्रवेश पात्रता | प्रवेश फी प्रति वर्ष परीक्षा फी सह | कालावधी (वर्ष) / माध्यम | स्वयं अध्ययन साहित्य उपलब्धता |
|---|---|---|---|---|
| एम.ए.- शिक्षणशास्त्र | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची/राज्य शासनाद्वारे वा केंद्र शासनाद्वारे मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषया -तील बी.ए. पदवी उत्तीर्ण (किमान ५०%) **किंवा** कोणत्याही मान्याताप्राप्त विद्यापीठाची/राज्य शासनाद्वारे वा केंद्र शासनाद्वारे मान्यता प्राप्त संस्थेची बी.ए. पदवी सोबत डी.एड./ डी. टी.एड उत्तीर्ण (किमान ५०%) **किंवा** कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाची/राज्य शासनाद्वारे वा केंद्र शासनाद्वारे मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील पदवी वा समकक्ष पदवी (बी.एड.) उत्तीर्ण (किमान ५०%) **किंवा** बी.ए.बीएड/ बी.एस्सी., बी.एड (एकात्मिक) उत्तीर्ण (किमान ५०%) **किंवा** बी.पी.एड/बी.एड (फिजिकल एज्युकेशन/ शारीरिक शिक्षण) उत्तीर्ण (किमान ५०%) **किंवा** बी.एड/ बी.ए. डी.टी.एड. (विशेष शिक्षण) उत्तीर्ण (किमान ५०%) | **11000/-** | **कालावधी - ०२- ०४ वर्ष माध्यम -** मराठी | **प्रथम वर्ष साठी सर्व विषयांची छापिल पुस्तके आहेत. तर,**<br><br>**द्वितीय वर्ष साठी सर्व विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य SOFT COPY माध्यमात उपलब्ध आहेत.** |

**टीप :-** एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी आहे की, महाराष्ट्र शासनाचे १५ जुलै २०१६ च्या पत्रकानुसार एम.ए. शिक्षणशास्त्र ही पदवी एन.सी.टी.ई. च्या अधिसूचने- नुसार एम.एड.पदवी शी समकक्ष समजण्यात आली आहे व राज्यातील खाजगी माध्यमिक शाळांतील शिक्षकांना निवडश्रेणीसाठी उपयुक्त आहे. **(संदर्भपत्र -DEEL (External Mode) Link** अंतर्गत **Important Circular & GR या Link वर बघावे.)**

❖ **उपलब्ध शिक्षणक्रम संरचना :-**

| शिक्षणक्रम | परीक्षा पद्धती |
|---|---|
| **एम. ए.** - मराठी<br>**एम. ए.** - हिंदी<br>**एम. ए.** - इंग्रजी<br>**एम. ए.** इतिहास<br>**एम. ए.** समाजशास्त्र<br>**एम. ए.** राज्यशास्त्र<br>**एम. ए.** अर्थशास्त्र<br>**एम. ए.** संरक्षण व सामरिकशास्त्र<br>एम.कॉम. | ▪ अंतर्गत कार्यात स्वाध्याय संमंत्रण/ संपर्क सत्र उपस्थिती अनिवार्य<br>१) स्वाध्याय - ८० गुण व संमंत्रण सत्रांसाठी उपस्थिती - २० गुण= १०० गुण<br>❖ ठराविक रविवारी/ सुट्टीच्या दिवशी **प्रती वर्ष एकूण ०५** संमंत्रण सत्रांचे **(Counselling Sessions)** आयोजन करण्यात येईल ,त्यास उपस्थित राहणे आवश्यक राहील.<br>▪ वर्षातून एकदाच अंतिम लेखी परीक्षा (वार्षिक) प्रत्येकी १०० गुण |
| एल.एल.एम. व<br>एम.ए.- शिक्षणशास्त्र | ▪ **प्रथम वर्षासाठी अंतर्गत कार्यात**<br>२) सेमिनार, व सादरीकरण १०० गुण.<br>३) स्वाध्याय - ८० गुण व संमंत्रण सत्रांसाठी उपस्थिती - २० गुण.<br>▪ **द्वितीय वर्षासाठी अंतर्गत कार्यात**<br>१) संशोधन कार्य, क्षेत्रीय कार्य (शोध निबंध) व मौखिक परीक्षा १०० गुण<br>२) स्वाध्याय - ८० व संमंत्रण सत्रांसाठी उपस्थिती - २० गुण.<br>▪ **वर्षातून एकदाच अंतिम लेखी परीक्षा (वार्षिक) प्रत्येकी १०० गुण**<br>❖ ठराविक रविवारी/ सुट्टीच्या दिवशी **प्रती वर्ष एकूण १०** संमंत्रण सत्रांचे (Counselling Sessions) आयोजन **बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग** ,जळगाव येथेच करण्यात येईल ,त्यास उपस्थित राहणे आवश्यक राहील. |

## ❖ शिक्षणक्रम प्रक्रियेबाबत इतर नियम

१. **मूल्यमापन पद्धती:-** विषयानुसार प्रत्येकी १०० गुणांची एकत्रित याप्रमाणे अंतिम लेखी परीक्षा घेण्यात येईल. ज्या शिक्षणक्रमांना स्वाध्याय, सेमिनार, प्रकल्प अहवाल लेखन अशा अंतर्गत कार्यांचे गुण शिक्षणक्रम संरचनेनुसार अंतिम निकालामध्ये नोंदविण्यात येतील.

**उत्तीर्ण (पास) होण्याचे नियम:-** विद्यापीठ नियमानुसार व्यावसायिक शिक्षणक्रमास अंतिम लेखी परीक्षेस ५०% गुण अनिवार्य असतील. अव्यावसायिक शिक्षणक्रमास अंतिम लेखी परीक्षेस ४०% गुण अनिवार्य असतील, तसेच बी.ए., बी.कॉम.साठी विद्यापीठ नियमानुसार अे.टी.के.टी. (ATKT) लागू राहील.

## ❖ प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :

अध्ययनार्थ्यांनी (विद्यार्थ्यांनी) ऑनलाईन अर्जासोबत खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे व बँकेत भरलेल्या चलनाची प्रत जोडून संबंधित प्रवेश केंद्रांवर विहित मुदतीच्या आत अर्ज जमा करावा. मुदत संपल्यानंतर अर्ज स्विकारला जाणार नाही. तसेच अपूर्ण भरलेला ऑनलाईन प्रवेश अर्ज स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## ❖ प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :

| पदव्युत्तर शिक्षणक्रम<br>(उदा. एम.ए./एम.कॉम./एल.एल.एम./इ.) |
|---|
| • १०वी किंवा १२ वीच्या Leaving Certificate (LC) ची साक्षांकित (Attested) ०१ प्रत आवश्यक आहे .<br>• पदवी किंवा समकक्ष असलेली पदवी उत्तीर्णचे प्रमाणपत्र व गुणपत्रकाची छायांकित (Photocopy) साक्षांकित (Attested) प्रत.<br>• मूळ स्थानांतरण (Original T.C) अनिवार्य .<br>• ज्या विद्यार्थ्यांचा ऑनलाईन प्रवेश अर्जावर जर PRN असेल तर त्या विद्यार्थ्यांनी सदर PRN चा उल्लेख असलेल्या महाविद्यालयाचा ऑनलाईन टि.सी प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.<br>• नावात बदल असेल तर त्यासंदर्भातील प्रकाशित राजपत्राची (Gazette) छायांकित (Photocopy) साक्षांकित (Attested) प्रत.<br>• इतर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मूळ स्थलांतर दाखला (Original Migration Certificate) अनिवार्य .<br>• राष्ट्रीय व राज्यस्तरावरील मुक्त विद्यापीठांच्या अध्ययनार्थीना (Student) स्थानांतरण प्रमाणपत्र (T.C.) विद्यापीठाकडून दिला जात नाही. म्हणून प्रवेशसाठी इच्छूक अध्ययनार्थ्योंने (Student) पूर्वी जी पदवी प्राप्त केली असेल, त्या पदवीचा मूळ स्थानांतरण प्रमाणपत्र (Original T.C/L.C.) तसेच विद्यापीठाचे मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Original Migration Certificate) प्रवेश घेतेवेळी जमा करणे अनिवार्य आहे. |

## ❖ प्रवेश केंद्रे :

▪ **सदर प्रवेश केंद्रे ही फक्त प्रवेश अर्ज जमा करण्यासाठीच आहे.**

अध्ययनार्थ्यांनी (विद्यार्थ्यांनी) ऑनलाईन अर्जासोबत खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे व बॅकेत भरलेल्या चलनाची प्रत जोडून संबंधित प्रवेश केंद्रांवर विहित मुदतीच्या आत अर्ज जमा करावा .

| अ.क्र. | प्रवेश केंद्रे | सांकेतांक | फोन नं. |
|---|---|---|---|
| १. | **मा. संचालक,** डील विभाग, कबचौउमवि, जि. जळगाव | १०१ | ०२५७-२२५७४९५/२२५८४९६ |
| २. | **मा. संचालक,** प्रताप तत्त्वज्ञान केंद्र, अमळनेर, जि. जळगाव | १०३ | ०२५८७-२२२२८० |
| ३. | **मा. संचालक,** म. गांधी तत्त्वज्ञान केंद्र, स्टेशन रोड, धुळे, जि. धुळे | २०१ | ०२५६२-२४०६४१ |
| ४. | **मा. संचालक,** एकलव्य प्रशिक्षण केंद्र, सरस्वती कॉलनी, तळोदा रोड, नंदूरबार, जि. नंदूरबार | ३०१ | ०२५६४-२३००२८ |

**महत्वाचे: ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रत व भरलेल्या शुल्काचे चलन ०१/०८/२०२० ते ३१/१०/२०२० दरम्यान पर्यंतचेच स्विकारले जातील.**

## ▪ संपर्कासाठी पत्ता व फोन नं. :

**बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग**

**Department of External Education and Learning (DEEL),**

**डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम विद्यार्थी भवन, पहिला मजला, रुम नं - २०४/०५,**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

## कार्यालय फोन नं - 0257-2257495/2258496

**E-mail :** **ideal@nmu.ac.in,**

**Facebook ID : DEEL,Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon.**

**संकेत स्थळ (Website):** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजूस असलेल्या Quick Link अंतर्गत DEEL (External Mode) लिंक.

**मा. संचालक,**

**बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग**